**MHYA050033192025**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.१०८/२०२५**
**कैलास बन्सी राठोड व इतर वि.कोणीही नाही**
(**निशाणी क्रं.१ वर आदेश**)

---

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार श्री.कैलास बन्सी राठोड, श्री.संतोष बन्सी राठोड व सौ.छाया सुरेश पवार यांनी मयत वडील बन्सी भिका राठोड व मयत आई सुभीबाई बन्सी राठोड **(यानंतर 'मयत बन्सी व सुभीबाई' असा उल्लेख)** यांचे ते कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसा प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मुंबई रेग्युलेशन, १८२७ च्या कलम २ अन्वये केला आहे.

२. अर्जदारांचे कथन आहे की, मयत बन्सी व सुभीबाई हे अर्जदार क्रं.१ ते ३ यांचे आई–वडील आहेत. मयत वडील बन्सी भिका राठोड यांचा मृत्यु दिनांक ०३/०१/२०२० रोजी व मयत आई यांचा मृत्यु दिनांक १९/०८/२०२१ रोजी झालेला आहे. त्यामुळे अर्जदार क्रं.१ ते ३ यांना न्यायालयीन तसेच इतर शासकीय योजनेकरीता, निमशासकीय किंवा खाजगी कामाकरीता मयत बन्सी व सुभीबाई यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे मयत वडील बन्सी भिका राठोड हे दिनांक ०३/०१/२०२० रोजी व मयत आई सुभीबाई बन्सी राठोड ही दिनांक १९/०८/२०२१ रोजी मयत झाली आहे. मयत बन्सी व सुभीबाई यांनी मृत्युपुर्वी कोणतेही मृत्यूपत्र अथवा व्यवस्था अधिकारपत्र करुन ठेवले नाही. अर्जदारांशिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. येणे प्रमाणे कारणावरुन अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

४. अर्जदारांव्यतिरिक्त मयत बन्सी व सुभीबाई यांचे दुसरे कोणीही वारसदार आहेत किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने दिनांक १५/०८/२०२५ रोजी *'विदर्भ मतदार'* या वृत्तपत्रात जाहिरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदर वृत्तपत्रातील जाहीरनाम्याची प्रत पटलावर **(निशाणी क्रं.१७)** अन्वये दाखल केली आहे. तसेच, सदरील

जाहीरनाम्याची एक प्रत बेलीफचा अहवाल (**<u>निशाणी क्रं.७ व ८</u>**) प्रमाणे नगरपरिषद कार्यालय, पुसद, तहसील कार्यालय पुसद यांच्या नोटीस बोर्डवर, मयतांच्या घरावर, अर्जातील नमुद मिळकत जमिनीवर आणि मा. दिवाणी न्यायालय व. स्तर,पुसद यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावून जाहीरनामा जाहीर केल्याचे दिसून येते. आजपर्यंत अर्जदारांव्यतिरिक्त मयत बन्सी व सुभीबाई यांचे इतर कोणी वारस असल्याबाबत या न्यायालयाला आक्षेप प्राप्त झाला नाही. वडील

**५.** अर्जदार श्री.कैलास बन्सी राठोड यांनी आपल्या कथनाचे पुष्ठर्थ अर्जदारांतर्फे स्वत:चे पुरावा शपथपत्र (**<u>निशाणी क्रं.११</u>**) अन्वये तपासले. तर आपल्या तोंडी पुराव्याच्या पुष्ठर्थ पटलावर कागदोपत्री पुरावा म्हणुन त्यांनी मयत वडील बन्सी भिका राठोड यांच्या मृत्युच्या प्रमाणपत्राची सत्य प्रत (**<u>निशाणी क्रं.१२</u>**), मयत आई सुभीबाई बन्सी राठोड यांच्या मृत्युच्या प्रमाणपत्राची सत्य प्रत (**<u>निशाणी क्रं.१३</u>**), अर्जदार क्रं.१ व २ यांच्या आधारकार्डची छायांकित प्रत (**<u>निशाणी क्रं.१४ व १५</u>**), मौजे कुंभारी, हनुमाननगर पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ येथील पोलीस पाटील यांनी दिलेल्या वारस प्रमाणपत्राची छायांकित प्रत (**<u>निशाणी क्रं.१६</u>**), दैनिक *'विदर्भ मतदार'* वर्तमानपत्राची प्रसिद्ध जाहिरनाम्याची छायांकित प्रत व दैनिक विदर्भ मतदार पत्राचे बिल (**<u>निशाणी क्रं.१७ व १८</u>**) वर दाखल केले आहे. तसेच, पुरावा बंद पुरसिस (**<u>निशाणी क्रं.१९</u>**) दाखल आहे. या कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत बन्सी भिका राठोड यांचा मृत्यु दिनांक ०३/०१/२०२० रोजी व मयत सुभीबाई बन्सी राठोड यांचा मृत्यु दिनांक १९/०८/२०२१ रोजी झाला आहे. पटलावरील पुराव्यावरुन व अर्ज (निशाणी क्रं.१) मधील कथनावरुन असे लक्षात येते की, अर्जामध्ये नमूद केलेला मयत बन्सी हा पुरुष व मयत सुभीबाई ही स्त्री नसल्याबद्दल पटलावर कोणताही आक्षेप कोणाकडूनही आला नाही.

**६.** पटलावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार क्रं.१ ते ३ हे मयत बन्सी भिका राठोड व सुभीबाई बन्सी राठोड यांची मुले आहेत. त्यामुळे अर्जदार क्रं.१ ते ३ यांच्या नावे मयताचे

वारस प्रमाणपत्र देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे.

**७.** अशाप्रकारे अर्जातील अर्जदार क्रं.१ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयत बन्सी भिका राठोड व सुभीबाई बन्सी राठोड यांचे इतर कोणतेही वारसदार हयात नाहीत, असे गृहीत धरुन मुंबई रेग्युलेशन अधिनियमाचे कलम २ अन्वये वारसांना प्रमाणपत्र निर्गमीत करण्याबाबत आदेश पारीत करणे आवश्यक आहे. कारण, या न्यायालयामध्ये आजतागायत मयत बन्सी भिका राठोड व सुभीबाई बन्सी राठोड यांचे अर्जदार क्रं.१ ते ३ व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार असल्याबद्दल आक्षेप प्राप्त झाला नाही. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. करीता, मी येणे प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

| –: **आदेश** :– | |
|---|---|
| **१.** | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | मयत वडील बन्सी भिका राठोड व मयत आई सुभीबाई बन्सी राठोड हे अर्जदार क्रं.१ श्री.कैलास बन्सी राठोड, अर्जदार क्रं.२ श्री.संतोष बन्सी राठोड व अर्जदार क्रं.३ सौ.छाया सुरेश पवार यांचे आई–वडील आहेत, असे मयताचे कायदेशीर वारस असल्याबद्दल मुंबई रेग्युलेशन १८२७ चे कलम २ अन्वये परिशिष्ट (ब) मधील नमुन्यात वारसांना प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे व त्याखाली नियमाप्रमाणे नोंद करावी किंवा नोट टाकावी. |
| **३.** | अर्जदारांनी नियमाप्रमाणे न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर प्रमाणपत्र निर्गमित करावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ABHIJIT ATRE
Date: 2026.04.24 15:46:38 +0530

**(ए. एस. अत्रे)**
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पुसद, जि.यवतमाळ

दिनांक : २४/०४/२०२६